Review Of Research
Vol. 2 , Issue. 1 , Oct; 12
ISSN:- 2249-894X
Available online at www.lbp.world

ORIGINAL ARTICLE

# मराठा स्वातंत्र्य युद्ध काळात संताजी व धनाजी यांनी समन्वय व सहकार्याने बजावलेली ऐतिहासिक कामगिरी

डॉ. डी. एस. कडव

**सारांश :**

मोगलांविरुद्धच्या स्वातंत्र्य युद्धकाळात मराठ्यांचे स्वतंत्र अस्तित्व, सामर्थ्य, पराक्रम, कौशल्य पणाला लागले होते. मराठा राज्याचे अस्तित्व नाममात्र उरले होते. मराठा सत्ता संपुष्टात आल्याचा समज शत्रू सत्तांचाच नव्हे तर खुद्द मराठा सरदार व जनतेचाही झाला होता. तो अनाठायी होता असे म्हणता येणार नाही. पण हा समज चुकीचा ठरविणारा संघर्ष व पराक्रम गाजवून संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव या सेनानींनी मराठा मोगल संघर्षाचा प्रवाहच बदलून टाकला. नवा इतिहास घडविणारे हे दोन सेनानी शत्रू विरूद्धच नव्हे तर परस्पराविरुद्ध लढले ज्यात संताजी घोरपडेचा अंत घडून आला. ही इतिहासाची दुसरी कटू पण सत्य बाजूही आहे त्यामुळेच संताजी व धनाजी हे परस्परांचे शत्रू होते, असाच समाज दृढ होत गेला. पण ती वस्तुस्थिती नव्हती. बहुतांश काळ त्यांनी सहकार्य व समन्वयाने कार्य केले होते व त्याचीच फलश्रुती मराठे - मोगल संघर्षाचा प्रवाह बदलण्यात, मराठ्यांच्या सरशीत व मोगलांच्या पिछेहाटीत झाला. हीच मराठा सत्तेच्या पुनर्जन्माची सुरुवात होती. याकरिता दोन्ही सरदारांनी समन्वय व सहकार्याने केलेली ऐतिहासिक कामगिरी कारणीभूत ठरली. या कामगिरीची व त्याच्या महत्वाची जाणीव व्हावी यासाठी सदर शोध निबंध प्रस्तुत आहे.

**विवरण :**

छत्रपती संभाजी महाराजांना कैद झाल्याची बातमी कळताच भावी संकटाची चाहूल छत्रपती कुटुंबाला व मराठा दरबारी मंडळींना झाली. येसूबाईच्या प्रस्तावाप्रमाणे राजाराम महाराजांना ९ फेब्रुवारी १६८९ रोजी राज्यप्रमुख घोषित करण्यात आले. हा निर्णय करतेवेळी संताजी घोरपडे व धनाजी जाधवही हजर होते.[१] या संकटमय परिस्थितीवर विचार विनिमय सुरु असतांनाच छत्रपती संभाजींच्या वधाची बातमी आली. या नंतर औरंजेबाने सर्व सामर्थ्यानिशी आक्रमण करून मराठ्यांची राजधानी ताब्यात घेण्याकरिता इतिकद्खान या सेनानीला पाठविले. २५ मार्च १६८९ रोजी त्याने रायगडच्या किल्ल्याला वेढा दिला.[२] या परिस्थितीतून मार्ग काढण्याकरिता येसूबाईच्या पुढाकाराने प्रमुख सरदारांची बैठक आयोजित केल्या गेली. या सरदारांमध्ये संताजी व धनाजी यांचाही समावेश होता.

मोगलांनी रायगडच्या किल्ल्याला वेढा दिल्या नंतर राजाराम महाराजा प्रमाणेच संताजी व धनाजी हे सुद्धा किल्ल्या बाहेर पडले. राजाराम महाराज पन्हाळगडावर असतांना मोगलांच्या वेढ्याची तीव्रता कमी व्हावी म्हणून रामचंद्र पंतांनी धनाजी जाधव व संताजी घोरपडे यांना मोगल सरदारांवर छापे टाकण्यासाठी रवाना केले.[३] धनाजी व संताजी यांनी अचाट पराक्रम करून मोगल आक्रमणाची लाट काही प्रमाणात थोपवून धरण्यात यश मिळविले.

संताजी व धनाजींनी मोगलांचे केंद्रस्थान असलेल्या कोरेगाव येथील बादशहाच्या छावणीवर हल्ला करण्याची योजना आखली. यानुसार संताजीने बादशहाच्या छावणीवर हल्ला करावा व त्याचवेळी फलटण, बारामती भागात असणाऱ्या रनमस्तखान व शहाबुद्दीनखान या मोगल सरदारांचा समाचार धनाजींनी घ्यावा असे निश्चित करण्यात आले. धनाजींनी संताजीच्या मदती करिता विठोजी चौहान या आपल्या सेनानीला दोन हजार सैन्यासह दिले. या सेनानींच्या मदतीने संताजीने मध्यरात्री बादशहाच्या छावणीवर हल्ला करून विशाल तंबू उधवस्त केला व डेऱ्याच्या सोन्याचे कळस कापून आणले.[४] याबद्दल राजाराम महाराजांनी संताजीस ममलकत-मदार (राज्याचा आधार ) हा किताब दिला. तर संभाजी राज्यांना पकडून बादशहाचे हवाली करणाऱ्या शेख निजाम याचा फलटणच्या रणमैदानावर धनाजी जाधवांनी पराभव केला. त्याबद्दल राजाराम महाराजांनी धनाजींना ' जयसिंहराव' हा किताब दिला.[५]

अशाप्रकारे संताजी व धनाजी यांनी अभूतपूर्व रीतीने मोगलांवर प्रती आक्रमणे केली असली तरी त्याचा विशेष परिणाम मोगलांच्या वाटचालीवर झाला नाही. रायगड व पन्हाळगड लढविणे अशक्य असल्याची जाणीव राजाराम महाराज व सेनानींना झाली. त्यामुळे राजाराम महाराजांना सुरक्षित स्थळी हलविण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी जिंजीला पाठविण्याचे ठरले.

पण जिंजीला जाण्यापूर्वी महाराष्ट्राचा कारभार चालविण्याकरिता महाराजांनी मराठा मंडळाची पुनर्रचना केली. त्यानुसार रामचंद्र पंत अमात्यांना 'हुकुमतपन्हा हा किताब देवून त्यांना मुख्य कारभारी तसेच संताजी व धनाजी यांना मदतनीस म्हणून नेमले.[६] मात्र डॉ. जयसिंगराव पवार यांनी " महाराणी ताराबाई यांना मुख्य कारभारी नेमले होते" असे विधान मराठे शाहीचा मागोवा या ग्रंथात केले आहे.[७]

अशाप्रकारे मुख्य कारभारी कोण होते हा मुद्दा या ठिकाणी गौण आहे. एवढे मात्र निश्चित की, मराठा मंडळाच्या कारभारात संताजी व धनाजी यांचा समावेश होता. ठरल्या प्रमाणे राजाराम महाराज जिंजीला जाण्यासाठी रवाना झाले. बिदनूरच्या राणीने महाराजांना आश्रय दिला. त्यामुळे औरंगजेब बादशाहने नाराज होऊन आपल्या तीन सरदारांना राणीला शिक्षा करण्याकरिता रवाना केले. याची वार्ता धनाजी यांना कळताच त्यांनी मोगल सरदारांवर हल्ले चढून मोगल सैन्याचा पराभव केला. त्यामुळे बिदनूरच्या राणीचे राज्य सुरक्षित राहिले.[८]

याव्यतिरिक्त संताजी व धनाजी यांनी रायगडचा वेढा उठवून इतिकादखानच्या सैन्यावर चौफेर हल्ले सुरु केले. याविषयी खाफीखान लिहितो "संताजी घोरपडे व धनाजी जाधव हे दोन विशेष अनुभवी योद्धे मराठ्यांकडे होते. त्यांनी बादशहाच्या फौजेचे फारच नुकसान केले. त्यांच्या समोर जो कोणी जाई तो मरण पावे अगर त्याच्या हातात तरी सापडे. एखादा कोणी निभवला तर कफल्लक होऊन परत येई. मी-मी म्हणणारे मुसलमान योद्धे त्यांच्यापुढे जाण्यास चरचर कापत, त्यांच्या समोर टिकाव धरणारा एकही मोगल योद्धा मोगलापाशी नव्हता. हे ऐकून औरंजेबाची पाचावर धारण बसली."[९]

पण संताजी व धनाजी यांचे हल्ले रायगडचा पाडाव करण्यापासून मोगलांना रोखू शकले नाही. मराठ्यांची राजधानी मोगलांच्या ताब्यात गेल्या नंतरही संताजी व धनाजी यांनी संघर्ष सुरु ठेवला. औरंजेबाने रुस्तमखान याला सातारा काबीज करण्यासाठी रवाना केले. तो सातारा मार्गावर असतांना धनाजी व संताजी यांनी त्याला अडविले. ईश्वरदत्त नागर म्हणतो " संताजी व धनाजी रुस्तमखानावर चालून गेले त्यावेळी त्याचा पुत्र गालीबखान आघाडी सांभाळीत होता. दोन्ही पक्षांनी त्यांच्याकडील गजदलाचा वापर सुरु केला....मराठ्यांच्या गजदलाने मोगल सैन्यावर हल्ला केला.... रुस्तमखान एकटाच लढत राहिला.[१०] रुस्तमखान पकडल्या गेला. त्याने पैसे देऊन स्वत:ची सुटका करून घेतली.

त्यांनतर औरंगजेबाने मोगल सरदारांना खटावच्या प्रदेशात मराठ्यांचा बंदोबस्त करण्यासाठी पाठविले. या सरदारांमध्ये रणमस्तखान, मामुलखान व लुत्फुल्लाखान यांचा समावेश होता. पण संताजी व धनाजी या सरदारांना हैराण केले.[११] डॉ. जयसिंगराव पवार यांनी नमूद केले आहे की "सन १६९१ च्या सुमारास रामचंद्र पंत अमात्यांच्या सल्ल्यानुसार धनाजी जाधव यांच्या ऐवजी संताजी घोरपडे यांना सेनापती पदावर नेमले.[१२]

दरम्यानच्या काळात राजाराम महाराज कर्नाटकातील जिंजीला गेल्याची वार्ता औरंगजेबाला कळताच त्याने सय्यद लष्करखान व काकडखान या सरदारांना जिंजीला पाठविले. याची माहिती मिळताच रामचंद्र पंतानी संताजी व धनाजींना जिंजीकडे रवाना केले. त्यांनतर २०-२५ हजारांच्या फौजेसह दोन्ही सेनानी जिंजीकडे निघाले. यावेळी संताजी व धनाजींच्या हल्ल्यामुळे मोगल सैनाची दाणादाण उडाल्याचे तत्कालीन कागदपत्रांमध्ये नमूद आहे. " संताजी व धनाजींशी लढण्याचा प्रसंग आला तर ते मारले जात असत किंवा ते पकडले जात असत. जो संताजी व धनाजींच्या हातून निसटून जात असे त्याला आपला पुनर्जन्म झाल्याचे वाटत असे."[१३]

ऑक्टोबर १६९२ च्या दरम्यान धनाजी व संताजी यांनी बेळगाव धारवाड या कर्नाटकातील प्रदेशात धुमाकूळ घालण्यास प्रारंभ केला. प्रथम त्यांनी बेळगावच्या परिसरातील किल्ले व ठाणी जिंकून घेतली. तसेच बेळगावच्या किल्ल्याला व त्यानंतर तो उठवून धारवाडच्या किल्ल्याला वेढा दिला.[१४]

२७ ऑक्टोबर १६९२ च्या बातमीनुसार "हरकऱ्याच्या तोंडून बातमी आली की, धनाजी जाधव व संताजी हे आजमनगर बेळगाव भागातून बाहेर पडले. ते धारवाडला पोहचले असून त्यांनी धारवाडच्या किल्लाला वेढा दिला." पण अधिक वेळ वेढा न देता मराठे नरगुंदकडे निघून गेले.[१५]

तर १९ डिसेंबर १६९२ च्या बातमीपत्रात उल्लेख आहे की, " धनाजी जाधव हा जिंजीच्या अलीकडे राजारामाच्या फौजेत पोहचला आहे आणि संताजी हा कोंदूगड (कोपल) हून निघून जिंजीकडे रवाना झाला आहे." जेधे शकावलीत नमूद आहे त्याप्रमाणे " राजारामाने कर्नाटकात होवून लष्कर जमाव केला व प्रांती राजश्री रामचंद्र पंडित शंकरजी पंडित सरकारकडून व धनाजी जाधवराव व संताजी घोरपडे सेनापती यांनी लष्कर जमाव करून चाळीस हजार शाई मिळविली. गडकोट मुलुख सोडविला नवेच राज्य पैदा केले."[१६]

बेळगावच्या प्रदेशात धुमाकूळ घातल्यानंतर धनाजी व संताजी जिंजीकळे रवाना झाले. जिंजीकळे जाऊन तेथील मोगलाचा वेढा उठविणे हे त्यांचे ध्येय होते. शत्रूप्रदेशाची नासाडी करीत ते जिंजीच्या प्रदेशात दाखल झाले. संताजी जवळ १५ हजार तर धनाजीकडे ७ हजार घोडदळ होते. प्रथम धनाजी जाधव जिंजीला पोहचले. त्यांनी मोगल सैन्यावर हल्ला चढवून इस्माईलखान मखा या नामांकित सेनानीला कैद

केले. तर दुसरीकडे संताजी घोरपडे यांनी अलिमदनिखान या दुसऱ्या मोगल सेनानीचा पराभव करून त्याला कैद केले.[१७]

संताजी व धनाजी यांनी परस्पर समन्वय व सहकार्य करून मोगलांविरुद्ध परिणामकारी संघर्ष केला. याचे परिणाम मराठ्यांसाठी अनुकूल होऊ लागले. मोगल सैन्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले. जिंजीला वेढा देणारी मोगल फौज व बादशहाची छावणी या दरम्यान दळणवळण बंद झाले. जिंजीकडील मोर्चे तसेच सोडून मोगल सैनिक युद्धतळाकडे परत येऊ लागले. मराठे किल्ल्या बाहेर पडून मोगलांचे मोर्चे उध्वस्त करू लागले. मद्रासकर इंग्रजांच्या लिहिण्याप्रमाणे, " खरोखरच जिंजीपुढील मोगल लष्कराची आता धडगत नव्हती. जुल्फिकारखानास राजाराम महाराजांकडे तहाची याचना करण्याशिवाय गत्यंत उरले नव्हते. खानाच्या विनंतीचा स्वीकार करून राजाराम महाराजांनी त्याला वांदिवाशपर्यंत माघार घेण्याची परवानगी दिली."[१८]

पण जुल्फिकारखानाला बिनशर्त माघारी जाण्याची परवानगी राजाराम महाराजांनी दिल्याचा निर्णय संताजीला आवडला नाही. या व इतर कारणावरून संताजी व राजाराम महाराज यांच्यात वाद झाला. महाराजांनी संताजीला सेनापती पदावरून दूर करून १६९३ मध्ये ते पद धनाजी जाधवांना दिले.[१९]

सेनापतीपद काढण्याचा व ते पद धनाजींना देण्याचा निर्णय राजाराम महाराजांचा असला तरी त्यामागे धनाजी जाधवांची फुस असल्याचा समज संताजिंचा झाला होता. त्यामुळे त्यांच्या संबंधात कटुता निर्माण झाली. मात्र लवकरच संताजींच्या मनातील गैरसमज दूर करण्यात आला. त्यांनतर पुन्हा सेनापती पद संताजी घोरपडेकडे देण्यात आले. संताजी व धनाजी यांनी संयुक्त मोहिमा काढण्याचे मान्य केले.[२०] त्याप्रमाणे संताजी व धनाजींना मोगलांविरुद्ध २२ जुलै १६९४ च्या बातमी पत्रानुसार " धनाजी जाधव व हनमंतराव हे ८ हजार स्वार व २ हजार पायदळ असे सैन्य घेऊन तडबीळ जवळ आले असून संताजी दोन कोसावर येऊन उतरला आहे. ते राजारामाचा दिवाण रामचंद्र यांच्या येण्याची वाट पाहत आहेत."[२१]

अशाप्रकारे १६९४-९५ च्या मोहिमेत संताजी तडबिड पासून दोन कोसावर पोहचल्यानंतर धनाजी जाधव व हनमंतराव निबाळकर त्यांना येऊन मिळाले. संताजी व धनाजींनी महिमानगडाला वेढा देण्याकरिता लष्करी तुकड्या पाठविल्या.[२२] सन १६९४ च्या शेवटी जुल्फिकारखानाने पुन्हा वेढा दिला व ऑक्टोबर १६९५ मध्ये वेल्लोरही वेढले. डिसेंबर १६९५ च्या अखेरी संताजी व धनाजीच्या फौजा पूर्व कर्नाटकाकडे आल्या. धनाजी वेल्लोरला आले. जुल्फिकारखानाने धनाजींचा पाठलाग करून त्यांना मागे सरकण्यास भाग पडले. मार्च १६९५ मध्ये संताजी घोरपडे त्याठिकाणी येताच परिस्थिती बदलली. मराठा लष्करासमोर निभाव लागणे शक्य नसल्याची जाणीव जुल्फिकारखानास होऊन त्याने बहुतेक ठाणी सोडून दिली.[२३]

मार्च १६९६ मध्ये धनाजी तर ८ मे १६९६ रोजी जिंजीला पोहचले. यांनतर मात्र संताजी घोरपडे व राजाराम महाराज यांच्यात बेबनाव निर्माण झाला.

महाराजांनी संताजीला सेनापती पदावरून काढूच टाकले नाही तर, त्यांच्या विरुद्ध लष्करी मोहीमही काढली. हा संघर्ष संताजी घोरपडे यांची हत्या झाल्यानंतरच थांबला. या संघर्षात धनाजी जाधवांनी लष्कराचे नेतृत्व केले. याचबरोबर संताजी व धनाजी यांच्यातील समन्वय व सहकार्याच्या युगाचाही अंत घडून आला.

**निष्कर्ष :**

**अशाप्रकारे १६८९ ते १६९६ या कालखंडात संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांनी परस्पर समन्वय व सहकार्याने मोगलांविरुद्धच्या मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धात केलेल्या संघर्षामुळेच नष्टप्राय बनलेल्या मराठा सत्त्तेचे पुनर्जीवन शक्य झाले होते. पराभवाचे रुपांतर विजयात होण्याचा मार्गही प्रशस्त बनला होता. मराठ्यांचे ऐक्यही अबाधित राहिले.**

**संताजी व धनाजींमधील समन्वय व सहकार्यामुळेच मोगल लष्करावर आघात करून त्यांच्यात दहशत निर्माण करणे मराठा लष्कराला शक्य झाले होते. म्हणूनच " पाण्यातही मोगलांच्या घोड्यांना संताजी व धनाजींची प्रतिमा दिसू लागली होती," इतकी दहशत त्यांची निर्माण झाली होती.**

**पण हा समन्वय व सहकार्य संपुष्टात येताच मराठ्यांमध्ये दुही निर्माण झाली. संताजींची हत्या झाली, मोगलांमध्ये उत्साह संचारला. कदाचित असे झाले नसते तर स्वातंत्र्य युद्धाचा शेवट तत्पूर्वीच झाला असता, किमान मराठ्यांचा इतिहास वेगळा घडला असता. हेच प्रतिबिंबित करण्यासाठी सदर शोध निबंध सादर आहे.**

**तळटीपा :**

**१. हेरवाडकर र. वि. - मल्हार रामराव चिटणीस विरचित श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज आणि थोरले. राजाराम महाराज यांचे चरित्र. पुणे १९७२ पृ. २, ३**

**२. सरदेसाई गो. स. - मराठा रियासत खंड २ - पाप्युलर प्रकाशन, मुंबई १९८९ पृ. १५३**

**३. कित्ता पृ. ११५.**

**४ पवार जयसिंगराव - सेनापती संताजी घोरपडे, मंजुश्री प्रकाशन कोल्हापूर, १९८७ पृ. २३**

**५ सरदेसाई - म. रि. खंड २ पृ. १७, १८ .**

**६ " भारतीय इतिहास आणि संस्कृती त्रैमासिक अंक ६४, १९९१ इतिहास संशोधन मंडळ, मुंबई पृ. १४**

**७ पवार जयसिंगराव - मराठेशाहीचा मागोवा, मंजुश्री प्रकाशन कोल्हापूर, १९९३ पृ. २१५.**

**८ पगडी सेतुमाधवराव (संपा) मराठे व औरंगजेब, पुणे १९६३ पृ. ४४, ४५**

**९ पगडी सेतुमाधवराव (संपा) मराठे व औरंगजेब संघर्ष फुल्हाने आलमगिरी लुत्फूलाची पत्रे , पुणे १९६३ पृ. ४०**

**१० कित्ता - पृ. ११३**

**११ कित्ता - पृ . ११३**

**१२ पवार जयसिंगराव - सेनापती संताजी घोरपडे, पृ. ४५**

**१३ सरकार जदुनाथ -** HISTORY OF AURANGZEB VOL. V CALCUTTA , 1991 **पृ. ३३.**

**१४ पगडी - (संपा) मोगल दरबारातील बातमीपत्रे खंड १, साहित्य संस्कृती मंडळ पुणे, १९७८ पृ. ७, ९**

**१५ कित्ता पृ. १०**

**१६ कित्ता पृ. १२**

**१७ जोशी श. ना. 'शिवचरित्र साहित्य खंड ६ - भारतीय इतिहास संशोधन मंडळ पुणे, पृ. ३८**

**१८ सरकार सर जदुनाथ (**ed.**)** "MARTIN'S MEMORIES'' VOL –III CULCUTTA - 1955 **पृ. २४७, २४८**

**१९ पवार जयसिंगराव - सेनापती संताजी घोरपडे, पृ. ६३**

**२० पगडी - मोगल दरबाराची कागदपत्रे खंड १ महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई १९७८ पृ. १२२.**

**२१ कित्ता - पृ. १२२**

**२२ भारतीय इतिहास आणि संस्कृती त्रैमासिक इतिहास संशोधन मंडळ, मुंबई अंक ५० पृ. ६५**

**२३ आपटे द. वि. , दिवेकर स. म. (संपा) जेधे शकावली शिवचरित्र प्रदीप, भारतीय इतिहास संशोधन मंडळ पुणे, १९२५ पृ. ३८**